नमुना व्ही

(नियम ८६ (फ) अन्वये)

उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन मर्यादित, कोल्हापूर यांचे समोर...

वसुली अर्ज क्र. ४०९/२०१९

स्वातंत्र्यसेनानी कै.श्रीपाल आलासे (काका)
कुरुंदवाड अर्बन को.ऑप बँक लि.
थिएटर चौक, कुरुंदवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर } अर्जदार

विरुद्ध

१. श्री.दस्तगीर रमजानसो बाणदार
रा.गांधी हॉस्पिटल परिसर इचलकरंजी , ता. हातकणंगले जि.कोल्हापूर.
२. श्री.रणजीत आप्पासो व्हणवाडे
रा.दिशा लेडीज कलेक्शन समोर शिरढोण ता.शिरोळ जि.कोल्हापूर.
३. श्री.महावीर भाऊ आडगाणे
रा.शिरढोण, ता. शिरोळ जि.कोल्हापूर. } जाबदार

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये दाखला मिळणेबाबतचा अर्ज:**
**वसूलपात्र रक्कम –१२०४६९/-**

१. अर्जदार बँकेने प्रकरण दाखल केलेची तारीख :- २१/६/२०१९
२. प्रकरणासोबत अर्जदार बँकेने सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल :-
    १. अर्जदार बँकेचा जाब देणार यांचेकडून रक्कम वसुलीसाठी दाखला मिळणेचा अर्ज.
    २. अर्जदार बँकेचा व्यवस्थापक मंडळाच्या दिनांक : २४/४/२०१९ ठराव क्र. १३ ची सत्य प्रत.
    ३. जाबदार यांना अर्जदार बँकेने प्रकरण सादर करणेपूर्वी दिलेल्या नोटीशीची प्रत.
    ४. जाब देणाऱ्यांना रक्कम रु. १०००००/- अदा केल्यापासूनचा अद्यावत हिशोबी तक्ता.
    ५. वचनचिठ्ठी सत्य प्रत.
    ६. करारनाम्याची सत्य प्रत.
    ७. अर्जदार बँकेस जाब देणार यांचेकडून येणे रक्कम सिद्ध करण्यास जरुरी असणारी इतर कागदपत्रे.
३. जाबदार यांना म्हणणे मांडण्यासाठी सुनावणी नोटीस पाठविल्याची तारीख : २१/६/२०१९
४. सुनावणी तारीख : ८/७/२०१९,१५/७/२०१९
५. जाबदार हजर राहिलेची तारीख : गैरहजर
६. अर्जदार बँकेतर्फे ॲडव्होकेट : नाही
७. जाब देणार तर्फे ॲडव्होकेट : नाही
८. जाब देणार यांनी अर्जदार बँकेचे येणेबाकी बाबत सादर केलेले म्हणणे : म्हणणे सादर केले नाही.

८अ. अर्जदार बँकेतर्फे क्लेम ॲफिडेव्हीट दाखल केले.

९. मे.निबंधकाचा अभिप्राय :-

ज्याअर्थी मी वर नमूद केलेल्या सर्व जाबदार यांना रितसर नोटीसा पाठवून व नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने सुनावणीसाठी व म्हणणे मांडण्यासाठी योग्य व भरपूर संधी दिली आहे. जाबदार यांनी म्हणणे सादर केले नाही.तसेच अर्जदार बँकेला उपरोक्त जाबदार यांनी करून दिलेली वचनिचठ्ठी, करारनाम व त्यानुसार बँकेने सादर केलेला खाते उतारा, क्लेम ॲफिडेव्हीट इ. कागदपत्रांची व व्यवहाराची छाननी व चौकशी केली असता माझी अशी खात्री झाली आहे की अर्जदार बँकेकडून जाबदार यांनी कर्ज घेतले असून ते थकविले आहे आणि ते वसूल होणेसाठी मी खालीलप्रमाणे हुकुम करीत आहे.

**<u>दि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०१ अन्वये</u>**

**<u>"वसुली दाखला"</u>**

उपरोक्त अर्जदार बँकेने उपरोक्त जाबदार यांचेकडून

| | |
|---|---|
| अर्जाची रक्कम रुपये | १२०४६९/- |
| या अर्जाची फी व खर्च रुपये रु. ५००/- | २८०५/- |
| अ) अर्जास लावलेला स्टॅम्प रु. २३०५/- | |
| ब) चौकशी फी व खर्च रु. | |
| क) जाहीर समन्स खर्च रु. | |
| **असे एकूण रु.** | **१२३२७४/-** |

तसेच मुद्दल रक्कम रु.१०००००/- यावर दिनांक ०१/०६/२०१९ पासून पुढे ही सर्व रक्कम परत फेड होईपर्यंत दरसाल दर शेकडा १४ टक्के दराने होणाऱ्या व्याजाची रक्कम अशी एकूण रक्कम मात्र दावा मुदतीत जाबदारांनी भरणा केलेली रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम जाबदार यांचेकडून वसूल करावी.

मी आणखी असाही हुकूम करतो की, जाबदार यांचेकडून वर नमूद केलेली रक्कम ही महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीस अनुसरून जमिन महसुलाची बाकी वसूल करणेच्या रितीप्रमाणे ती जाबदार यांचेकडून वसूल करावी अथवा, अर्जदार यांनी या वसुली दाखल्याची बजावणी त्यांचेकडील ज्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि दि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ यातील नियम १०७ अन्वये अधिकार प्राप्त झाले आहेत, त्यांचेमार्फत या वसुली दाखल्याची बजावणी करून रक्कम वसूल करण्यात यावी. यासाठी स्वतंत्र अर्ज या कार्यालयाकडे करणेची जरुरी नाही.

हा वसुली दाखला आज दिनांक 15 JUL 2019 रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिला आहे.

**उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा),**
**कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी**
**असोसिएशन मर्या. कोल्हापूर**

**<u>टीप :-</u>**

१) सदरचा वसुली दाखला हा जाबदार यांचेकडून रक्कम वसुलीचा अंतिम दाखला असून, त्यावर त्यांना अपील करता येणार नाही. मात्र सदरचा निर्णय अमान्य असल्यास या विरुद्ध मा. विभागीय सह. निबंधक सह. संस्था कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे कलम १५४ खाली रिव्हीजन अर्ज करता येईल.

२) कलम ९१ खाली नमूद केलेल्या तरतुदी प्रमाणे हा वादाचा विषय होत नसलेने या विरुद्ध मा. सहकार कोर्टात अपील दाखल करून घेता येणार नाही तसेच स्थगनादेशही देता येणार नाही.